
ePaper
धारावी पुनर्विकासाने जीवनमान उंचावणार, बालकांचे कुपोषण दूर होणार!

वर्ष - 8 । अंक - 325 | UDYAM-MH-26-0158827



महाईन्यूज ™

## आतील पानांत

- मी असंही तिथे बॉलिंग करणार नाहीये
- आकाशदीपचे २ चेंडूत २ मोठे विकेट
- दलाई लामांची निवड कशी होणार?
- ब्रह्मोस डागल्यानंतर परिस्थिती होती?

www.mahaenews.com | शुक्रवार, दि. 4 जुलै 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## ठाकरे बंधूंच्या मेळाव्यासंदर्भात बोलावणे नसल्यामुळे काँग्रेस रुसली : शरद पवारही जाणार नाहीत !

# 'महा आघाडी' त बिघाडी !

## ठाकरे बंधूंचा विजयी मेळावा दि. 5 जुलै रोजी : सहभागी होण्यास दोन्ही काँग्रेसची नकारघंटा !

। मुंबई। प्रतिनिधी । महाईन्यूज

**हिंदी सक्ती संदर्भातील दोन्ही 'जीआर' मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रद्द केल्यामुळे ठाकरे बंधूंनी जाहीर केलेल्या विजयी मेळाव्याचे निमंत्रण काँग्रेस पक्षाला नसल्यामुळे त्यांचे प्रदेशाध्यक्ष आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते शरद पवार हे मेळाव्यात सहभागी होणार नाहीत. त्यामुळे, मेळाव्या आधीच 'महा आघाडी' मध्ये बिघाडी झाल्याचे स्पष्ट झाले आहे.**



### शुक्रवारी रंगीत तालीम

मराठी भाषा, मराठी माणूस, आणि महाराष्ट्र यांच्या भल्यासाठी हिंदी सक्तीच्या विरोधात संघर्षाची भाषा केलेले उद्धव ठाकरे आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे राज ठाकरे या ठाकरे बंधूंच्या 'विजयी मेळाव्या' ची जय्यत तयारी झाली असून दोन्ही बाजूंनी पूर्ण नियोजन झाले आहे आणि त्या सभेची रंगीत तालीम शुक्रवारी होत आहे. या मेळाव्याचे दोन्ही बाजूंच्या प्रवक्त्यांनी आणि नेत्यांनी 'मिनिट टू मिनिट' नियोजन केल्याचेही सांगण्यात येते.

### काँग्रेसला निमंत्रण नाही

ठाकरे बंधूंच्या भूमिकेशी सहमत असणाऱ्या सर्व राजकीय पक्षांच्या नेत्यांनी या मेळाव्यात सहभागी व्हावे असे आवाहन ठाकरे बंधूंनी प्रसिद्ध केलेल्या पत्रात केले होते. परंतु, निमंत्रण नसल्यामुळे काँग्रेसचे नेते सहभागी होणार नाहीत असे समजते.

### जयंत पाटील म्हणाले..

ठाकरे बंधूंच्या या मेळाव्याला राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते शरद पवार जाणार नाहीत, असे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी म्हटले आहे. आमच्या अध्यक्षांचा निर्णय आम्हाला शिरसावंद्य असतो, असे शरद पवार यांनी स्पष्ट केले आहे.

### राज्यात वातावरण तापले!

हिंदी भाषेच्या मुद्द्यावरून राज्यात वातावरण तापलेले पाहायला मिळत आहे. पहिली पासून हिंदीची सक्ती नको, अशी भूमिका राज्यातील अनेक संघटना आणि विरोधी पक्षांची होती. याच मुद्द्यावरून शिवसेना ठाकरे गट आणि मनसे एकत्रित येऊन मोर्चा काढणार होते. परंतु, त्यापूर्वीच फडणवीस सरकारकडून त्रिभाषा सूत्राचे दोन्ही जीआर रद्द करण्यात आले. मात्र, आता त्याच दिवशी ठाकरे बंधू एकत्र येऊन विजयी मेळावा घेणार असून त्याचीही जय्यत तयारी झाली आहे.

### 'मविआ' मध्ये धुसफूस..

या विजयी मेळाव्याच्या मुद्द्यावरून महा विकास आघाडीत मात्र बिघाडी झाल्याचे पाहायला मिळत आहे. या मेळाव्याचे निमंत्रण काँग्रेसला देण्यात आलेले नसल्याचा मुद्दा पुढे करून ठाकरे बंधूंच्या विजयी मेळाव्याला आता शरद पवारही जाणार नाहीत, हे स्पष्ट झाले आहे.

### ठाकरे बंधूंचा 'मोठा इव्हेंट'!

दि. ५ जुलैच्या ठाकरे बंधूंच्या विजयी मेळाव्याचे निमंत्रण पाठवले आहे की नाही? हेच समजू शकत नाही आणि ते काँग्रेसला मिळाले नसल्याचे म्हटले जात आहे. आम्हाला अजून तसे काही निमंत्रण मिळालेले नाही किंवा सांगण्यात आलेले नाही. कदाचित, हा राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांचा इव्हेंट असू शकतो. दि. ५ जुलै हा मोर्चा काढण्यासाठी दिवस ठरला होता. पण हा जीआर रद्द झाला आहे असे मला अजूनही वाटत नाही, कारण 'महायुती' ने यासंदर्भात डॉ. नरेंद्र जाधव समिती नेमली आहे. त्यामुळे 'मुंह में राम, बगलमें नथुराम' या भाजपाच्या नीतीपासून जपून राहणे आवश्यक आहे. दि.५ जुलैचा दिवस मराठी लोक साजरा करतील, त्यांना आमच्या शुभेच्छा आहेत, अशी प्रतिक्रिया काँग्रेस नेते अतुल लोंढे यांनी दिली होती.

### पवार यांची भूमिका काय?

यानंतर आता शरद पवार हेही ठाकरे बंधूंच्या कार्यक्रमाला हजर राहणार नाहीत. पत्रकारांशी संवाद साधत असताना शरद पवार यांना यासंदर्भात प्रतिक्रिया विचारण्यात आली. मराठीच्या मुद्द्यावर ठाकरे बंधू एकत्र येऊन विजयी मेळावा घेत आहेत, यात तुमचा पक्ष सहभागी असणार का? असा प्रश्न शरद पवार यांना विचारण्यात आला. यावर बोलताना, ठाकरे बंधूंच्या मेळाव्याबाबत माहिती नाही. आमच्या पक्षाचे अध्यक्ष जयंत पाटील हे मला भेटले होते. ते म्हणाले होते की, या सगळ्या कामात आम्ही सहभागी होणार नाही. त्यामुळे पक्षाच्या अध्यक्षांचा निर्णय हा आम्हाला शिरसावंद्य असतो, असे शरद पवार यांनी सांगितले. तुम्ही या मेळाव्याला जाणार का, असा प्रश्न पत्रकारांनी केला. यावर शरद पवार यांनी नकारात्मक उत्तर दिले. मी त्या मेळाव्याला जाणार नाही. माझे कार्यक्रम दुसरीकडे आहेत, असे शरद पवार यांनी स्पष्ट केले.

### गर्दी होईल पण मत परिवर्तनाचे काय?

ठाकरे बंधूंच्या या विजयी मेळाव्याकडे सत्ताधारी भारतीय जनता पार्टी, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांचे अगदी बारीक लक्ष आहे. निवडणुका जवळ आल्या की या मंडळींना मराठी भाषा, मराठी माणूस, महाराष्ट्राचे तुकडे असे शब्द आठवतात. त्या सभेला मोठी गर्दी होईल, पण त्या गर्दीचे पुढे मतदानामध्ये रूपांतर होत नाही, हे सत्ताधाऱ्यांनाच काय दोन्ही ठाकरेंना देखील माहित आहे, असे 'महायुती' चा नेता म्हणाला.

### पृथ्वीराज चव्हाण यांचा सूर

दरम्यान, महाराष्ट्रात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांत काँग्रेस ही उद्धव ठाकरे व शरद पवार यांच्याशीच युतीबाबत चर्चा करणार असल्याचे काँग्रेसचे ज्येष्ठ नेते व माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी सांगितले. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेची उद्धव सेनेशी जवळीक वाढल्याच्या मुद्द्यावर काँग्रेसचे नेते आणि माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण म्हणाले की, हा त्यांचा घरगुती विषय आहे.

# नगर रस्त्यावर अडथळ्यांची शर्यत!

## दररोज दीड लाख वाहनांच्या गर्दीत येरवड्याचा श्वास कोंडला

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**खासगी प्रवासी बसचे थांबे, अवजड वाहनांची सातत्याने वाहतूक, पदपथांवर अतिक्रमणे, अर्धवट विकासकामे अशा अडथळ्यांच्या शर्यतीत दररोज सुमारे दीड लाख वाहनांची वर्दळ येरवडा परिसरात सुरू असते. त्यामुळे वाहनांच्या गर्दीत येरवडा परिसराचा श्वास कोंडल्यासारखी स्थिती आहे.**



येरवडा परिसरातील प्रमुख रस्त्यांची गुरुवारी 'लोकसत्ता' प्रतिनिधीने पाहणी केली. त्यामध्ये ही स्थिती आढळून आली. पूर्व-पश्चिम भाग जोडणाऱ्या येरवड्यातील शास्त्री चौक हा वाहतूक कोंडीचे केंद्रबिंदू झाला आहे. या चौकातून पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळाकडे जाण्याचा मार्ग आहे. त्यामुळे या रस्त्यावरून अतिमहत्त्वाच्या (व्हीआयपी) व्यक्तींची जा-ये सुरू असते. त्यांचा ताफा आल्यावर वाहतूक थांबविण्यात येते. त्यामुळे अनेकदा या रस्त्यावर वाहतूक कोंडीला सामोरे जावे लागते.या परिसरात उच्चभ्रू सोसायट्यांपासून आयटी कंपन्या, सरकारी आणि खासगी संस्थांची कार्यालये, शाळा-महाविद्यालये, धार्मिक स्थळे, पंचतारांकित हॉटेल्स, मॉल्स आहेत. त्यातच दाट वस्तीचा भागही आहे. त्यामुळे वाहतूक कोंडीत भर पडत आहे. पुण्यातून नगर रस्त्याने मराठवाडा, विदर्भात जाणाऱ्या खासगी प्रवासी बस या मार्गाचा वापर करतात. बंडगार्डन, येरवडा, चंदनगर, खराडी, वाघोली ते बायपासपर्यंत खासगी प्रवासी बसची कार्यालये आणि थांबे आहेत. रस्त्याच्या दुतर्फा या बस उभ्या असतात. प्रवाशांना सोडण्यासाठी आलेली वाहनेही थांबत असल्याने वाहतूक कोंडीत भर पडत आहे.पूर्व-पश्चिम भाग जोडणाऱ्या येरवड्यातील शास्त्री चौक मुख्य आहे. या चौकातच येरवडा पोलीस आणि विमानतळ वाहतूक पोलीस ठाणी आहेत. कल्याणीनगर, विमानतळ, नागपूर चाळ, गोल्फ कोर्स आणि गुंजन चित्रपटगृह या परिसरातील रस्ते याच चौकात एकत्र येतात. सीसीटीव्ही, वाहतूक नियंत्रण दिवे असतानाही वाहनचालकांकडून या चौकात उलट्या दिशेने प्रवास करणाऱ्या वाहनांचे प्रमाण जास्त आहे.या रस्त्यावर बीआरटी मार्ग होता. तो काढून टाकण्यात आला आहे. काही ठिकाणी रुंदीकरणाचे काम सुरू आहे. मात्र, पदपथांवर अतिक्रमणे झाली आहेत. काही ठिकाणी दुरुस्तीच्या कामांमुळे रस्त्यालगत लोखंडी अडथळे उभे करण्यात आले असून, 'पीएमपी'चे थांबे मागे गेल्याने प्रवाशांना रस्त्यावर येऊन बसची प्रतीक्षा करावी लागत आहे.वाहतूक पोलिसांनी नगर रस्त्यावरील येरवडा ते खराडीपर्यंत सर्व रस्ते बंद करून दूरवर 'यू-टर्न' तयार केले आहेत. ,नागपूर चाळ किंवा इतर परिसरातील स्थानिकांना विचारात घेतलेले नाही. त्यामुळे पादचाऱ्यांना रस्ता ओलांडणेही कठीण झाले आहे. रात्रीच्या वेळी शास्त्री चौकात खासगी बस आणि वाहनांची मोठी गर्दी असल्याने वाहतूक कोंडी होत आहे, असे या परिसरातील नागरिक प्रमोद देवकर म्हणाले.

### नागरिक काय म्हणतात?

या परिसरातील नगर रस्त्यावरून दररोज ७५ हजार मोठी वाहने, खुळेवाडीतून १८ हजार वाहने आणि पूर्वेकडे जाणारी ८५ हजार अशी सुमारे दीड लाख वाहनांची वर्दळ सुरू असते. अतिमहत्त्वाच्या व्यक्ती या मार्गावरून जात असल्याने वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी अनेक उपाययोजना करण्यात आल्या आहेत. खासगी बसचालकांना वाहने उभे करण्यास मज्जाव करण्यात आला असून, रस्ता रुंदीकरण सुरू आहे. दिवस-रात्र ३८ पोलीस कर्मचारी काम करत आहेत. पूर्वीपेक्षा वाहतूक कोंडी कमी झाली असून, रुंदीकरण झाल्यावर वाहतूक सुरळीत होईल. कल्याणीनगर, विमानतळ, नागपूर चाळ, गोल्फ कोर्स आणि गुंजन चित्रपटगृह या परिसरातील रस्ते याच चौकात एकत्र येतात.

# नव्या पिढीत फुलेंचे विचार पोहोचणे आवश्यक

## राज्यात विशिष्ट सामाजिक वातावरण तयार होत आहे : शरद पवार

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**देशात आणि विशेषतः राज्यात विशिष्ट सामाजिक वातावरण तयार होत आहे. या पार्श्वभूमीवर नव्या पिढीत वैचारिक स्पष्टता येण्यासाठी फुले दाम्पत्याचे काम आदर्श ठरेल. महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांचे विचार जास्तीत जास्त लोकांपर्यंत जाणे गरजेचे आहे,' असे मत राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते, माजी केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार यांनी येथे व्यक्त केले.**



महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीकडून आयोजित 'सावित्रीबाई, जोतिबांचे शिक्षक मिचेल दाम्पत्य आणि स्त्री शिक्षणातील पूर्वसूरी' या कामिल पारखेलिखित पुस्तकाचे प्रकाशन पवार यांच्या हस्ते झाले. त्या वेळी ते बोलत होते. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती ट्रस्टचे अध्यक्ष गणेश चिंचोले, सचिव दीपक गिरमे, राष्ट्रवादीचे प्रवक्ते अंकुश काकडे, माजी आमदार जयदेव गायकवाड, ज्येष्ठ पत्रकार अरुण खोरे, चेतक बुक्सचे मदन हजेरी या वेळी उपस्थित होते.पवार म्हणाले, 'शिक्षणाचा विस्तार हा इंग्रजांच्या धोरणाचा भाग होता. त्यानुसार इंग्रजांनी संस्थात्मक उभारणी केली. त्यामध्ये मिशन केंद्र उभे करून शिक्षण दिले जात होते. सामान्य कुटुंबातील मुला-मुलींना त्याचा लाभ होत होता. महात्मा फुले यांना शिक्षणासाठी याचा फायदा घेता आला. फुले यांचे विचार समाजापर्यंत पोहोचले आहेत. मात्र, अजूनही काम करण्याची गरज आहे.'महात्मा फुले हे बांधकाम क्षेत्रामध्ये होते. खडकवासला धरणाच्या पायाभूत कामात त्यांचा सहभाग होता. कात्रजच्या बोगद्याचे काम त्यांच्या कंपनीने केले. या क्षेत्रातील आगळेवेगळे कठीण काम साधनसामग्री नसताना त्यांनी केले,' असे पवार म्हणाले.स्वातंत्र्याच्या अगोदर राणी आणि पंचम जॉर्ज भारतात आले असताना महात्मा फुले यांनी त्यांना निवेदन दिले. दुष्काळ असल्याने खडी फोडण्याची शिक्षा देऊ नका. तलाव बांधण्याचे काम दिले, तर दुष्काळातून सुटका होईल. विलायतेतून चांगले बियाणे उपलब्ध करून द्या. केवळ शेतीमधून आर्थिक प्रश्न सुटत नाही, तर संकरित गाय पाठवून दुधाचा जोड व्यवसाय करता येईल, अशा मागण्या फुले यांनी त्यामध्ये केल्या होत्या,' असे पवार यांनी सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राहुल माने यांनी, तर जॅकलीन पारखे यांनी आभारमहाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीकडून आयोजित 'सावित्रीबाई, जोतिबांचे शिक्षक मिचेल दाम्पत्य आणि स्त्री शिक्षणातील पूर्वसूरी' या कामिल पारखेलिखित पुस्तकाचे प्रकाशन पवार यांच्या हस्ते झाले. त्या वेळी ते बोलत होते. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती ट्रस्टचे अध्यक्ष गणेश चिंचोले, सचिव दीपक गिरमे, राष्ट्रवादीचे प्रवक्ते अंकुश काकडे, माजी आमदार जयदेव गायकवाड, ज्येष्ठ पत्रकार अरुण खोरे, चेतक बुक्सचे मदन हजेरी या वेळी उपस्थित होते.

### अजूनही काम करण्याची गरज

पवार म्हणाले, 'शिक्षणाचा विस्तार हा इंग्रजांच्या धोरणाचा भाग होता. त्यानुसार इंग्रजांनी संस्थात्मक उभारणी केली. त्यामध्ये मिशन केंद्र उभे करून शिक्षण दिले जात होते. सामान्य कुटुंबातील मुला-मुलींना त्याचा लाभ होत होता. महात्मा फुले यांना शिक्षणासाठी याचा फायदा घेता आला. फुले यांचे विचार समाजापर्यंत पोहोचले आहेत. मात्र, अजूनही काम करण्याची गरज आहे.

## आरटीओचे दुर्लक्ष, खासगी बसचे भाडे दामदुपट्ट

# पिंपरी चिंचवडमधील प्रवाशांची 'सरकारमान्य' लूट

## बसच्या मनमानी भाड्यामुळे प्रवाशांच्या खिशाला चाट

। पिंपरी-चिंचवड ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**सुट्ट्यांचा हंगाम सुरु झाला की, नागरिकांना मूळ गावी जाण्याचे किंवा नातेवाईकांना भेटण्यासाठी अथवा पर्यटनाला जाण्याचे वेध लागतात. ह्या काळात रेल्वेला असलेली गर्दी, प्रतीक्षा यादी बघता सामान्य नागरिक हा खासगी प्रवासी बसद्वारे प्रवासाला प्राधान्य देतो. मात्र ,नेमकी प्रवाश्यांची ही गरज ओळखून खासगी बस मालकांनी प्रचंड भाडेवाढ केली आहे. यातून ग्राहकांची पिळवणूक आणि लूटमार सुरू आहे.**



दरम्यान, जास्त भाडे आकारणी करणाऱ्या बसचालक, मालक आणि कंपन्यांविरुद्ध कारवाई करण्यात आरटीओ आखडता हात घेत असल्याने प्रवाशांची चक्क 'सरकारमान्य' लूट सुरू आहे.पिंपरी-चिंचवड ही कामगार, कष्टकऱ्यांची नगरी म्हणून ओळखली जाते. राज्याच्या तसेच परराज्यातील कानाकोपऱ्यातून लाखोंच्या संख्येने चाकरमानी उद्योगनगरीत वास्तव्यास आहेत. दिवाळी तसेच उन्हाळ्यात मुलांना शाळेला सुटी लागत असल्याने अनेक जण कुटूंबासह गावी जाण्यास प्राधान्य देतात. शहरातून मूळगावी जाणाऱ्या प्रवाशांमध्ये विदर्भ आणि मराठवाड्यातील प्रवाशांची संख्या अधिक आहे. मुख्यत्वे दिवाळी आणि उन्हाळी सुट्टीच्या काळात ही संख्या खूप मोठी असते. उन्हाळी सुट्टीच्या पार्श्वभूमीवर रेल्वेचे बुकिंग फुल्ल झालेले आहे. एसटी महामंडळाकडेही प्रवाशांची गर्दी असते. त्यामुळे प्रवाशांना खासगी ट्रॅव्हल्स हाच पर्याय शिल्लक असतो.

मात्र, याच संधीचा खासगी प्रवासी वाहतुक करणारे गैरफायदा उठवतात. शहरातून दररोज सुमारे पाचशेहून अधिक खासगी बस राज्याच्या विविध भागात जातात. या व्यतिरिक्त मुंबईहूनही मोठ्या संख्येने खासगी बस पुण्यातून पुढे मार्गस्थ होतात. ट्रॅव्हल्स चालकांकडून या काळात मोठ्या प्रमाणात तिकीट दर वाढवले जातात. काही ठिकाणी तिकीट दरामध्ये दुप्पट, तिप्पट वाढ केली जाते. ही वाढ प्रवाशांच्या खिशाला चांगलाच चाट लावत आहे. प्रवाशांची संख्या वाढण्याच्या काळात बसचे भाडे वाढविण्याचे प्रकार होतात. त्यामुळे प्रवाशांना मोठा भुर्दंड बसत आहे. त्यामुळे सुटीच्या काळात गावी जावे की नाही असा प्रश्न सर्वसामान्यांना भेडसावत आहे. उन्हाळी सुट्टीच्या कालावधीत खासगी प्रवासी बसची वाहतूक पथकामार्फत तपासणी करावी. तिकिट बुकिंग काउंटरवरदेखील जाऊन तपासणी व्हावी. गैरप्रकार आढळल्यास संबंधितांवर कारवाई केली जावी. भाडेवाढीमुळे प्रवाशांना विनाकारण भुर्दंड सहन करावा लागत आहे. या त्रासापासून सुटका होऊन नागरिकांची होणारी लूटमार थांबवावी, अशी मागणी प्रवाशांमधून केली जात आहे.

### सरकारच्या कमाल दराकडे दुर्लक्ष

खासगी प्रवासी बसला एसटी बसच्या प्रतिकिलोमीटर भाडेदाच्या दीडपट भाडे आकारता येते. याबाबतचे कमाल भाडे सरकारने निश्चित केले आहे. हे दीडपट दर केवळ उन्हाळी सुट्टीच्या कालावधीत असतात. काही खासगी प्रवासी बस सणासुदीच्या व गर्दीच्या हंगामामध्ये प्रवाशांकडून मनमानी भाडे आकारतात. मात्र, जास्त भाडे आकारणाऱ्या खासगी बसवर आरटीओ आणि वाहतूक पोलिसांकडून कोणतीही कारवाई होताना दिसत नाही. त्यामुळे खासगी आराम बस चालकांच्या मनमानीत वाढ होत आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या बसमालकांवर आरटीओने कारवाई करणे गरजेचे आहे.

## बचत गटांच्या महिलांकडून मालमत्ता कर बिलांचे वाटप!

## मालमत्ताधारकांनी सहकार्य करावे : पिंपरी-चिंचवड पालिका प्रशासनाचे आवाहन

। पिंपरी-चिंचवड ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिका कर संकलन व कर आकारणी विभागाच्या वतीने २०२५-२६ या आर्थिक वर्षातही महिला बचत गटाच्या मार्फत बिलांचे वाटप सुरू करण्यात आले आहे. तरी बिल वाटप करण्यासाठी येणाऱ्या महिलांना सहकार्य करावे, असे आवाहन महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे.**





पिंपरी-चिंचवड शहरात ६ लाख १५ हजार ८६३ नोंदणीकृत मालमत्ता आहेत. त्यानुसार सर्वच बिलांची छपाई होऊन बिले वाटप करण्यास सुरुवात झाली आहे. महिला बचत गटातील महिलांच्या माध्यमातून मिळकतकर बिले घरोघरी पोहोचवण्याची जबाबदारी महानगरपालिकेने महिला आर्थिक विकास महामंडळावर सोपवली आहे. बिल वाटप करण्यात येणाऱ्या महिलांना महानगरपालिकेच्या वतीने ओळखपत्र ही देण्यात आले आहे. ३१ मे पर्यंत सर्व बिलांचे वितरण करण्याचे नियोजन महानगरपालिकेने केले आहे. तरी नागरिकांनीही बिल वाटप करण्यासाठी येणाऱ्या महिलांना सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात येत आहे. मालमत्ता कर भरण्याची ऑनलाइन सुविधा पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने आर्थिक वर्ष २०२५-२६ ची मालमत्ता कर बिले ऑनलाइन प्रसिद्ध करण्यात आली असून, करदात्यांना त्यांच्या नावावर नोंद असलेल्या मालमत्तांची बिले www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर पाहता व भरता येतील. तसेच मालमत्ता कर बिले ३० जूनपर्यंत ऑनलाईन पद्धतीने बिले भरल्यास सामान्य करावर १० टक्के सवलत मिळणार आहे.

> बचत गटांच्या महिलांमार्फत मालमत्ता कर बिलांचे वाटप सुरू झाले आहे. यामुळे बचत गटांच्या महिलांच्या आर्थिक सक्षमतेस बळकटी मिळणार आहे. तसेच नागरिकांपर्यंत वेळेवर बिले पोहोचवण्याच्या उद्देशालाही चालना मिळणार आहे. नागरिकांनी देखील बिल वाटप करण्यासाठी येणाऱ्या महिलांना सहकार्य करावे.
>
> - शेखर सिंह, आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी चिंचवड महानगरपालिका

> पिंपरी चिंचवड महानगरपालिका मालमत्ता कर विभागाचे बिल वाटप महिला बचत गटांच्या महिलांमार्फत करण्यात येत आहे. ३० जून २०२५ पर्यंत कर भरल्यास मालमत्ताधारकांना विविध सवलतींचा लाभ घेता येणार आहे. तरी जास्तीत जास्त मालमत्ताधारकांनी लवकरात लवकर कर भरून सवलतींचा लाभ घ्यावा.
>
> - प्रदीप जांभळे पाटील, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.

## श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची प्रवचने



### सद्गुरूची कामगिरी

सद्गुरूची कामगिरी कोणती ? आरशावर धूळ पडलेली असते, ती बाजूला सारायला सद्गुरू सांगतात; आपले चुकते कुठे ते सद्गुरू सांगतात. सद्गुरू आपल्याला मार्गाला लावतात. स्वप्नामध्ये तलावात पडला म्हणून ओरडू लागला, तोच जागा झाल्यावर ओरडायचा थांबला ! सद्गुरू जागे करण्याचे काम करतात. मला करायचेच काही उरले नाही असे ज्याने म्हटले, त्याने सद्गुरू खरोखर केला असे म्हणावे. एखादा सुखवस्तू गृहस्थ 'मी स्वस्थ आहे' असे म्हणतो, पण ते काही खरे नाही. मन जोवर गिरक्या मारते तोपर्यंत तो स्वस्थ आहे असे नाही म्हणता येणार.

शिष्याच्या भावनाच गुरूला गुरुपद देतात. जो शरण जातो त्याचा कार्यभार सद्गुरू उचलतो. ज्याची दृष्टी रामरूप झाली तो खरा गुरू. जे चिरकाल टिकते ते गुरुपद समजावे. खरोखर, सद्गुरू म्हणजे मूर्तिमंत नामच होय. गुरूने सांगितलेले अक्षरश: पाळणे हेच खरे साधन. संत कुणालाही देहाने कायमचे लाभले नाहीत. संतांना भगवंताचा जो ध्यास असतो तो महत्त्वाचा आहे. पुष्कळांना संतांची गाठ पडते, परंतु सत्संगतीचे महत्त्व न कळल्यामुळे बहुतेकांना त्यापासून जो व्हायला पाहिजे तो फायदा होत नाही. आपली जी कर्तव्ये ठरली आहेत ती आपण बरोबर करावीत. व्यापार थोडक्या प्रमाणात केला तर पुढे वाढतो, त्याप्रमाणे कर्तव्य करीत गेल्याने फलाची आशा आपोआप सुटेल. आपले कर्तव्य कोणते ते सद्गुरू आपल्याला दाखवून देतात. रथ आहे खरा, पण जर त्याला सारथी म्हणजे चालवणारा नसेल, तर रथ कुठेतरीच जाईल. केवळ ' गाडी माझी आहे ' म्हणून ती मालकाला चालविता येणार नाही; साधी बैलगाडी सुद्धा चालविता येणार नाही. आपला देह मनुष्य आपल्या मनाने चालवितो, आणि खड्ड्यामध्ये पडतो. सद्गुरू हे गाडीवानाचे काम करतात आणि आपल्या देहरूपी गाडीला योग्य रस्त्यावरून नेतात. आपण नेहमी भगवंताच्या अनुसंधानात मग्न असावे आणि गाडीवानावर विश्वास ठेवून निर्धास्त असावे, मग कसलाच धोका उरणार नाही; आपल्या नशिबात जेवढे मिळायचे असेल तेवढेच आपल्याला मिळणार, अशी वृत्ती बनून आपले हवेपण कमी होईल. मनाची ही वृत्ती झाली की, जे घडेल ते भगवंताच्या इच्छेनेच घडेल असे आपल्याला वाटू लागेल. असे वाटू लागले की समाधान चालत घरी येईल. पण हे सगळे होण्यासाठी आपल्या अंत:करणाची शुद्धता हा पाया आहे.



'स्टेट'मेंट

अधिकराव दिवे-पाटील
संस्थापक, संपादक

# ठाकरे बंधूंचा विजयी मेळावा, मराठीसाठी मंगलमय सोहळा!

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मराठी हिंदी वादामध्ये यु-टर्न घेतला आणि हिंदी सक्ती बाबत असलेले जीआर रद्द केले. आपल्याच ताठर आणि भक्कम भूमिकेमुळे मुख्यमंत्र्यांवर नामुष्कीची वेळ आल्याची भावना राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांनी बोलून दाखवली आणि हा मराठी भाषेचा तसेच मराठी माणसाचा विजय आहे, असेही ठासून सांगितले. फडणवीस यांनी माघारीची ही भूमिका घेतली नसती, तर दोन्ही ठाकरेंचा प्रचंड मोठा मेळावा दि. ५ जुलै रोजी होणार होता, परंतु तो रद्द करून त्याचेच रूपांतर आता विजयी मेळाव्यात होणार आहे.**



### ठाकरे बंधूंचे सगळे ठरले !

मराठी भाषा, मराठी माणूस, महाराष्ट्र हे विषय आले की ठाकरे बंधू अक्षरशः पेटून उठतात. मुंबई महानगरपालिका आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका अगदी तोंडावर आल्या असल्यामुळे ठाकरे बंधूंसाठी ही मोठी पर्वणी ठरली आहे आणि विजयोत्सव साजरा करण्यासाठी त्यांनी संपूर्ण कसब आणि ताकद पणाला लावली आहे, हे लक्षात घ्यायला हवे !

### बऱ्याच वर्षांनी ठाकरे बंधू एका मंचावर !

उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे एकत्र येणार असून मेळाव्याच्या निमित्ताने वरळीतील 'एनएससीआय डोम' मध्ये मंचावर एकत्र दिसतील. वास्तविक, हिंदी भाषा पहिल्या इयत्तेपासून शिकवण्यासंदर्भातील शासन आदेश रद्द करण्यासाठी उद्धव सेना आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना यांनी मोर्चा कढण्याचे ठरविले होते. मात्र, त्यापूर्वीच फडणवीस यांनी यासंदर्भातील दोन्ही शासन आदेश मागे घेत असल्याची घोषणा केली आणि मोर्चे रद्द झाले. त्यानंतर आता नियोजित तारखेलाच ठाकरे बंधू एकत्रितपणे विजयी मेळावा घेणार आहेत. हा मेळावा कसा असणार, याची माहिती समोर आली आहे.

### दोन्ही पक्षाच्या नेत्यांच्या वारंवार बैठका..

ठाकरे बंधूंच्या विजयी मेळाव्याच्या नियोजनासाठी गेल्या काही दिवसांपासून दोन्ही सेनेंचे नेते एकमेकांना भेटत आहेत. बुधवारी रात्री मनसे आणि उबाठा गटाच्या नेत्यांची संयुक्त बैठक वरळी डोम येथे पार पडली. या बैठकीत मेळावा कसा व्हावा? यासंबंधी महत्वाचे निर्णय घेण्यात आले. या बैठकीला मनसेकडून बाळा नांदगांवकर, संदीप देशपांडे आणि नितीन सरदेसाई उपस्थित होते. तर ठाकरेंच्या शिवसेनेकडून अनिल परब, सुनिल शिंदे हे नेते उपस्थित होते. या बैठकीत मेळाव्याची रुपरेषा निश्चित करण्यात आली.

### मेळाव्याच्या नियोजनाचे मुद्दे..

मेळाव्यापूर्वी ठाकरे बंधूंच्या आगमनापासून भाषणापर्यंतची प्रत्येक गोष्टीची रंगीत तालीम शुक्रवारी केली जाणार आहे.

मेळाव्यात केवळ ठाकरे बंधूंची भाषणे होणार आहेत. इतर पक्षांचे अध्यक्ष आल्यास केवळ पक्षाध्यक्षांचीच भाषणे होतील असे ठरले आहे. व्यासपीठावर केवळ पक्षाध्यक्षांनाच स्थान दिले जाणार आहे. इतर सर्व नेते खाली व्यासपीठासमोर बसणार आहेत, अशा प्रकारचे नियोजन आहे.

### मोजक्या नेत्यांची भाषणे..

ठाकरे बंधू आणि इतर सहकारी पक्षांचे अध्यक्ष आले तर ते अशी मोजकी भाषणे होतील. इतर कोणाचीही भाषणे होणार नाहीत. संजय राऊत, आदित्य ठाकरे, अमित ठाकरे हे देखील व्यासपीठाच्या खालीच बसणार आहेत. सर्व नेत्यांचा सन्मान जपला जाईल, अशी आसनव्यवस्था असणार आहे. मेळाव्याचा केंद्रबिंदू मात्र ठाकरे बंधूच राहणार आहेत. शिवाय, मुंबईत जिथे शक्य असेल तिथे एलईडी स्क्रीन लावल्या जाणार आहेत. विजयी मेळाव्याचे थेट प्रक्षेपण लोकांना पहाता येणार आहे.

### नियोजन ही संयुक्त जबाबदारी..

दोन्ही ठाकरेंचे पक्ष आणि त्यांचे नेते आपापला पक्षीय अहंकार बाजूला ठेवून या मेळाव्यासाठी झोकून देऊन काम करतील असे ठरले आहे. गर्दीचे नियोजन ही मेळाव्यातील दोन्ही पक्षांची संयुक्त जबाबदारी असणार आहे.

दोन्ही ठाकरेंच्या पक्षांमधील नेत्यांच्या विशेष टीम तयार करुन जबाबदारीचे वाटप केले जाणार आहे. वरळी डोममध्ये गर्दी झाल्यास डोमच्या गॅलरीही कार्यकर्त्यांसाठी खुल्या केल्या जाणार आहेत. वरळी डोम परिसरात मोकळ्या जागेत अतिरिक्त शेड टाकून बैठक व्यवस्था केली जाणार आहे.

### पोस्टरद्वारे डिवचणे नको..

बॅनरबाजी, पोस्टर, घोषणाबाजीतून एकमेकांना डिवचले जाणार नाही, याची काळजी घेण्याच्या सूचना दोन्ही पक्षाच्या कार्यकर्त्यांना केल्या जाणार आहेत. सोशल मीडिया, बॅनर, जाहिरातींद्वारे या मेळाव्याची जोरदार प्रसिद्धी केली जाण्याची जबाबदारीही दोन्ही पक्षांच्या विशेष टीमकडे सोपवण्यात आली आहे.

### भाषणे खणखणीत होणार..

ठाकरे बंधूंची भाषणे मात्र खणखणीत होणार आहेत. यामध्ये आधी कोण बोलणार आणि नंतर कोण बोलणार याबाबत मात्र गोपनीयता ठेवण्यात आली आहे. कार्यकर्त्यांना सुद्धा ते ऐनवेळी समजेल. या सोहळ्याला लाखोंची गर्दी होईल म्हणून चंगराचेंगरी टाळण्यासाठी देखील उपाययोजना करण्यात आले आहेत.

### मतामध्ये परिवर्तन कसे ?

ठाकरेंच्या सभा म्हणजे प्रचंड गर्दी नेहमीच होते, पण प्रत्यक्षात त्याचे मतांमध्ये परिवर्तन होत नाही हा इतिहास आहे. याचाही अभ्यास करून उबाठा गट आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना यांचे मतदानाची टक्केवारी कशी वाढेल, याचा विचार, तसे नियोजन आणि व्यूहरचना करण्यासाठी देखील विशेष समिती स्थापन झाली आहे. आता सर्वांना प्रतीक्षा आहे ती ५ जुलैची! ठाकरे बंधूंचा हा विजयी मेळावा म्हणजे मंगलमय सोहळा कसा होईल, यामध्ये सगळे गढून गेले आहेत !

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# प्रदूषण नियंत्रणासाठी सरकारचा निर्णय!

## पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांची विधान परिषदेत घोषणा

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**चंद्रपूर परिसरातील औष्णिक विद्युत केंद्र, कोळसा खाणी व स्टील उद्योगांमुळे निर्माण होणाऱ्या प्रदूषणाचा प्रश्न गंभीर आहे. या प्रश्नावर शासन जागरूक आहे. त्यामुळे चंद्रपूरसारख्या प्रदूषण क्लस्टर असलेल्या भागासाठी स्वतंत्र प्रदूषण नियंत्रण आराखडा तयार करण्याची सरकारची भूमिका असून, लवकरच त्यावर निर्णय घेतला जाईल, अशी माहिती माहिती पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी विधान परिषदेत दिली.**



अर्धातास चर्चेदरम्यान उमा खापेर यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना मंत्री मुंडे बोलत होत्या. चंद्रपूरमधील औद्योगिक परिसर २०१० मध्ये क्रिटिकली पॉल्युटेड एरिया (सीपीए) म्हणून नोंदवलेला होता, मात्र विविध उपायांमुळे प्रदूषण निर्देशांक ८३ वरून ५४ वर आला आहे. त्यामुळे काही उद्योगांना अटींवर परवानग्या देण्यात आल्या आहेत. प्रदूषण नियंत्रणासाठी उद्योगांना ईएसपी (इलेक्ट्रोस्टॅटिक प्रिसिपिटेटर), डस्ट कलेक्टर, ऑनलाइन मॉनिटरिंग सिस्टीम, जलप्रदूषण नियंत्रणासाठी ट्रीटमेंट प्लांट, पाण्याचा पुनर्वापर, रस्त्यांचे पक्कीकरण व पाणी फवारणी सारख्या अटी बंधनकारक करण्यात आल्या असल्याचेही मुंडे म्हणाल्या.राज्य शासन वेळोवेळी उद्योगांना नोटिसा देऊन तपासणी करीत आहे. नियमभंग करणाऱ्यांवर कारवाई केली जात आहे, उद्योगांची अनामत रक्कम जप्त करण्यात आली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांना प्रदूषण नियंत्रणासाठी निधीही वितरित करण्यात आला आहे. मात्र काही ठिकाणी निधी खर्च झाला नसल्याची स्थिती आहे. चंद्रपूरसारख्या प्रदूषण क्लस्टर असलेल्या भागासाठी स्वतंत्र प्रदूषण नियंत्रण आराखडा तयार करण्याची सरकारची भूमिका आहे. सरकार चंद्रपूर उद्योग समूहाच्या परिसरातील प्रदूषण कमी करण्यासाठी अत्यंत जागरूक आहे. पर्यावरण संरक्षणासाठी दिलेला निधी स्थानिक स्वराज्य संस्थांनी वेळेत खर्च करावा, असेही मुंडे म्हणाल्या. अर्धातास चर्चेदरम्यान उमा खापेर यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना मंत्री मुंडे बोलत होत्या.

### लवकरच त्यावर निर्णय घेतला जाईल

चंद्रपूरसारख्या प्रदूषण क्लस्टर असलेल्या भागासाठी स्वतंत्र प्रदूषण नियंत्रण आराखडा तयार करण्याची सरकारची भूमिका आहे. सरकार चंद्रपूर उद्योग समूहाच्या परिसरातील प्रदूषण कमी करण्यासाठी अत्यंत जागरूक आहे. पर्यावरण संरक्षणासाठी दिलेला निधी स्थानिक स्वराज्य संस्थांनी वेळेत खर्च करावा, असेही मुंडे म्हणाल्या.क विद्युत केंद्र, कोळसा खाणी व स्टील उद्योगांमुळे निर्माण होणाऱ्या प्रदूषणाचा प्रश्न गंभीर आहे. या प्रश्नावर शासन जागरूक आहे. त्यामुळे चंद्रपूरसारख्या प्रदूषण क्लस्टर असलेल्या भागासाठी स्वतंत्र प्रदूषण नियंत्रण आराखडा तयार करण्याची सरकारची भूमिका असून, लवकरच त्यावर निर्णय घेतला जाईल, अशी माहिती माहिती पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी विधान परिषदेत दिली. अर्धातास चर्चेदरम्यान उमा खापेर यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना मंत्री मुंडे बोलत होत्या.

चंद्रपूरमधील औद्योगिक परिसर २०१० मध्ये क्रिटिकली पॉल्युटेड एरिया (सीपीए) म्हणून नोंदवलेला होता, मात्र विविध उपायांमुळे प्रदूषण निर्देशांक ८३ वरून ५४ वर आला आहे. त्यामुळे काही उद्योगांना अटींवर परवानग्या देण्यात आल्या आहेत. प्रदूषण नियंत्रणासाठी उद्योगांना ईएसपी (इलेक्ट्रोस्टॅटिक प्रिसिपिटेटर), डस्ट कलेक्टर, ऑनलाइन मॉनिटरिंग सिस्टीम, जलप्रदूषण नियंत्रणासाठी ट्रीटमेंट प्लांट, पाण्याचा पुनर्वापर, रस्त्यांचे पक्कीकरण व पाणी फवारणी सारख्या अटी बंधनकारक करण्यात आल्या असल्याचेही मुंडे म्हणाल्या.राज्य शासन वेळोवेळी उद्योगांना नोटिसा देऊन तपासणी करीत आहे. नियमभंग करणाऱ्यांवर कारवाई केली जात आहे, उद्योगांची अनामत रक्कम जप्त करण्यात आली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांना प्रदूषण नियंत्रणासाठी निधीही वितरित करण्यात आला आहे. मात्र काही ठिकाणी निधी खर्च झाला नसल्याची स्थिती आहे.

# मराठवाड्यात पवन ऊर्जा प्रकल्पांत वाढ!

## 1 हजार 200 मेगावॅटची धाराशिवमध्ये नोंदणी; जिल्ह्यांत 2150 ऊर्जा

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर पवन ऊर्जा प्रकल्पांमध्ये सरकार कोणाचाही हस्तक्षेप सहन करणार नाही, असा संदेश गेल्याने राज्यात पवन ऊर्जा क्षेत्रातील ४ हजार २८४ मेगावॅटपैकी २ हजार १५० मेगावॅटचे प्रकल्प धाराशिव, बीड आणि लातूर जिल्ह्यात प्रस्तावित आहेत.**



यातही सर्वाधिक गुंतवणूक धाराशिव जिल्ह्यात असून, आतापर्यंत ३५८ पवनचक्क्या उभ्या राहिल्या आहेत. १ हजार २०० मेगावॅटचे काम सुरू असल्याची माहिती अपारंपरिक ऊर्जा मंत्रालयातील अधिकाऱ्यांनी दिली. धाराशिवमध्ये काही ठिकाणी पवन ऊर्जा प्रकल्पास येणाऱ्या अडचणी सोडविण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नुकतीच बैठक घेतल्याचे सांगण्यात आले. बालाघाटच्या डोंगररांगा पवन ऊर्जा प्रकल्पास पोषक असणारा भाग असल्याचे जाहीर झाल्यानंतर धाराशिव जिल्ह्यात १२ कंपन्यांनी आता १२०० मेगावॅट ऊर्जानिर्मितीचे प्रकल्प हाती घेतले आहेत. एक मेगावॅट उत्पादन घेण्यासाठी साधारणपणे तीन कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. त्यानुसार एकट्या धाराशिव जिल्ह्यात तीन हजार कोटी रुपयांची गुंतवणूक हाईल, असा दावा केला जात आहे. धाराशिव जिल्ह्यातील तुळजापूर तालुक्यापासून बीडच्या सीमेलगत असलेल्या वाशी तालुक्यापर्यंत आणि कर्नाटक सीमेवरील उमरगा तालुक्यापासून नगर जिल्ह्यापर्यंत पवन ऊर्जा प्रकल्पाचे काम सध्या जोरात सुरू आहे. सुयोग ऊर्जा, एनर्जी इन्फ्राजेएसडब्ल्यू रिन्यूव्हेबल एनर्जी (डी), आवदा एनर्जी, रिन्यूव्ह सोलार, रिन्यूव्ह ग्रीन एनर्जी सोल्युशन, रिन्यूव्ह सोलार पॉवर, सेरेंटिका रिन्यूव्हेबल इंडिया, सेरेंटिका रिन्यूव्हेबल इंडिया-४, श्री मारुती विंड पार्क डेव्हलपर्स, टाटा पावर रिन्यूव्हेबल एनर्जी या कंपन्यांनी या जिल्ह्यात गुंतवणूक वाढविली आहे.

### जिल्हास्तरीय तक्रार मंच

१२०० मेगावॅट प्रकल्पाची नोंदणी झाली असल्याची माहिती अपारंपरिक ऊर्जा मंत्रालयातील अधिकाऱ्यांनी दिली.शेतकऱ्यांना जमिनीचे भाडे देताना कंपन्यांकडून शेतकऱ्यांना फसविले जात असल्याच्या आरोपामुळे काही ठिकाणी आंदोलने होत असल्याने राज्य सरकारच्या आदेशान्वये राज्यात जिल्हास्तरीय पवन ऊर्जा संनियंत्रण समिती स्थापन करण्यात आली आहे.धाराशिव जिल्ह्यात ३०१ तक्रारी प्राप्त झाल्या असून, यांपैकी १७५ तक्रारींचे निवारण करण्यात आले आहे. तर विविध कारणांमुळे १२६ तक्रारी अद्यापही समितीकडे प्रलंबित आहेत.मराठवाड्यातील धाराशिव, बीड आणि लातूर जिल्ह्यात पवन ऊर्जानिर्मितीचे मोठे केंद्र निर्माण करण्याचा प्रयत्न सुरू आहे. येत्या काळात या क्षेत्रात आणखी गुंतवणूकदार येत आहेत. या तीन जिल्ह्यांमध्ये तसेच सोलापूरमध्ये सौर प्रकल्प वाढविण्याचा विचारही राज्य सरकार करत आहे.

# दलाई लामांची निवड कशी होणार?

## चीनच्या दाव्यावर भारताची नेमकी भूमिका काय?

**। नवी दिल्ली ।**
**प्रतिनिधी : महाईन्यूज ।**

**तिबेटचे धर्मगुरू दलाई लामा यांचा उत्तराधिकारी कोण असणार? याची मोठी चर्चा सध्या पाहायला मिळत आहे. सध्याचे १४वे दलाई लामा अर्थात तेन्झिन ग्यात्सो उर्फ ल्हामा थोंडुप यांच्यानंतर 'दलाई लामा' हे पद रद्द होणार असल्याची चर्चा सुरू झाली होती. मात्र, नुकतेच खुद्द लामा यांनीच ही पद्धत कायम राहणार असून २०१५ साली स्थापन झालेल्या गेडन फोड्रंग ट्रस्टकडे पुढील दलाई लामा निवडीचे अधिकार असतील, असं त्यांनी स्पष्ट केलं आहे. या पार्श्वभूमीवर एकीकडे चीननं 'सुवर्ण कलश' पद्धतीने चीन सरकार हे ठरवणार असल्याचा दावा केला असताना भारत सरकारने आपली परखड भूमिका मांडली आहे.**




१४वे दलाई लामा तेन्झिन ग्यात्सो यांच्यानंतर ही पद्धत बंद होणार असल्याच्या चर्चेवर खुद्द लामांनीच पडदा टाकल्यानंतर चीनच्या दाव्यावरून वाद निर्माण झाला आहे. दलाई लामा हे फुटीरतावादी विचारांना प्रोत्साहन देत असल्याचा आरोप करत चीननं पुढील लामांची नियुक्ती ही चीन सरकारच्या परवानगीनेच होईल, असा दावा केला. शिवाय, सुवर्ण कलशातूनच पुढील लामांच्या नावाची निवड होईल, असंही नमूद केलं.१७९२ साली चीनमधील क्विंग राजसत्तेनं सुवर्ण कलश अर्थात 'गोल्डन अर्न' या पद्धतीची सुरुवात केली. तिबेटच्या बौद्ध गुरूंच्या निवडीसाठी ही पद्धत वापरण्यात येईल, असं तेव्हा जाहीर करण्यात आलं होतं. त्यात बौद्ध नेते, दलाई लामा आणि पंचेन लामा यांचा समावेश होता. यात उमेदवारांची नावे चिठ्ठ्यांवर ठेवून या चिठ्ठ्या सुवर्ण कलशात ठेवल्या जात. त्यातून एक चिठ्ठी काढून त्यावरील नावाची घोषणा केली जाई. एकीकडे ही पद्धत दलाई लामांच्या निवडीतील गैरप्रकार टाळण्यासाठी असल्याचा दावा केला जात असताना दुसरीकडे यातून चीन सरकारनं दलाई लामा निवडीच्या प्रक्रियेवर आपलं वर्चस्व कायम ठेवण्यासाठीच ही पद्धत राबवल्याचीही टीका झाली. आता पुन्हा एकदा चीननं हीच पद्धत राबवण्याचा दावा केला आहे.दलाई लामांनी २०११ व २०२४ मध्ये या पद्धतीवर आपली भूमिका स्पष्ट केली होती. या दोन्ही वेळी दलाई लामा यांनी सुवर्ण कलशाची पद्धत कोणत्याही प्रकारे आध्यात्मिक स्वरूपाची नसून पूर्णपणे राजसत्तेच्या वर्चस्वाचं माध्यम म्हणूनच राबवली गेल्याचं स्पष्ट केलं आहे. ही पद्धत मांचूंनी सुचवली होती, मात्र तिबेटी नागरिकांची या पद्धतीवर श्रद्धा नाही, असंही त्यांनी म्हटलं होतं. आजतागायत फक्त १०वे लामा या पद्धतीने ठरवले गेले होते, मात्र तेव्हाही प्रत्यक्षात ही पद्धत पाळली गेलीच नव्हती. फक्त प्रघात म्हणून तसं सांगण्यात आलं होतं, असंही लामांनी स्पष्ट केलं होतं. दरम्यान, लामांनी आता धरमशालामधील आपल्या ट्रस्टकडूनच पुढील दलाई लामांची निवड केली जाईल, हे स्पष्ट केल्यानंतर भारत सरकारनं या भूमिकेला समर्थन दिलं आहे. केंद्रीय मंत्री किरेन रिजिजू व राजीव रंजन सिंह हे रविवारी दलाई लामांच्या ९०व्या वाढदिवसानिमित्त आयोजित कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत. या पार्श्वभूमीवर केंद्रीय अल्पसंख्याक मंत्री किरेन रिजिजू यांनी सरकारची भूमिका स्पष्ट केली."पुढील दलाई लामांची निवड करण्याची प्रक्रिया ठरलेल्या नियमांप्रमाणे आणि विद्यमान दलाई लामांच्या इच्छेनुसारच होईल. त्यांच्याव्यतिरिक्त इतर कुणालाही ही निवड करण्याचा अधिकार नाही. सर्व तिबेटी नागरिक आणि बौद्ध धर्माच्या नालंदा परंपरेच्या अनुयायांसाठी ही सर्वात महत्त्वाची बाब आहे", असं किरेन रिजिजू यांनी नमूद केलं.

### नेमका वाद काय?

१४वे दलाई लामा तेन्झिन ग्यात्सो यांच्यानंतर ही पद्धत बंद होणार असल्याच्या चर्चेवर खुद्द लामांनीच पडदा टाकल्यानंतर चीनच्या दाव्यावरून वाद निर्माण झाला आहे. दलाई लामा हे फुटीरतावादी विचारांना प्रोत्साहन देत असल्याचा आरोप करत चीननं पुढील लामांची नियुक्ती ही चीन सरकारच्या परवानगीनेच होईल, असा दावा केला. शिवाय, सुवर्ण कलशातूनच पुढील लामांच्या नावाची निवड होईल, असंही नमूद केलं.१७९२ साली चीनमधील क्विंग राजसत्तेनं सुवर्ण कलश अर्थात 'गोल्डन अर्न' या पद्धतीची सुरुवात केली. तिबेटच्या बौद्ध गुरूंच्या निवडीसाठी ही पद्धत वापरण्यात येईल, असं तेव्हा जाहीर करण्यात आलं होतं. त्यात बौद्ध नेते, दलाई लामा आणि पंचेन लामा यांचा समावेश होता. यात उमेदवारांची नावे चिठ्ठ्यांवर ठेवून या चिठ्ठ्या सुवर्ण कलशात ठेवल्या जात.

# ब्रह्मोस डागल्यानंतर काय परिस्थिती होती?

## पाकिस्तानी पंतप्रधानम्हणाले, "आमच्याकडे केवळ 30 ते 45 सेकंद..."

**। नवी दिल्ली ।**
**प्रतिनिधी : महाईन्यूज ।**

**एका वरिष्ठ पाकिस्तानी राजकारण्याने कबूल केले आहे की, त्यांच्या लष्कराकडे ऑपरेशन सिंदूर दरम्यान भारताने डागलेल्या ब्रह्मोस क्रूझ क्षेपणास्त्रात अण्वस्त्रे होते की नाही, याचे विश्लेषण करण्यासाठी अवघे ३० ते ४५ सेकंद होते. पाकिस्तानचे पंतप्रधान शहबाज शरीफ यांचे सल्लागार असलेल्या राणा सनाउल्लाह यांनी भारत-पाकिस्तान संघर्षादरम्यान अण्वस्त्र युद्धाचा धोका जास्त होता, असेही म्हटले आहे.**




"जेव्हा भारताने नूर खान एअरबेसवर ब्रह्मोस डागले, तेव्हा येणाऱ्या क्षेपणास्त्रात अण्वस्त्रे असू शकतात का, याचे विश्लेषण करण्यासाठी पाकिस्तानी लष्कराकडे फक्त ३०-४५ सेकंद होते. फक्त ३० सेकंदात यावर काहीही निर्णय घेणे ही एक धोकादायक परिस्थिती होती," असे सनाउल्लाह यांनी एका पाकिस्तानी वृत्तवाहिनीला सांगितले. रावळपिंडीच्या चकलाला येथे नूर खान हे पाकिस्तानी हवाई दलाचे एक प्रमुख एअरबेस आहे. "मी असे म्हणत नाही की, त्यांनी अणुबॉम्बचा वापर न करून चांगले केले, परंतु त्याच वेळी या बाजूच्या लोकांना त्याचा गैरसमज झाला असता, तर त्यामुळे पहिला अणुबॉम्ब डागण्यात आला असता आणि जागतिक अणुयुद्ध सुरू झाले असते", असे ते पुढे म्हणाले.ऑपरेशन सिंदूर' दरम्यान भारताने अनेक पाकिस्तानी हवाई तळांवर हल्ले केले, ज्यामुळे धावपट्टी, हँगर आणि इमारतींचे नुकसान झाले होते. उपग्रह छायाचित्रांमध्ये सरगोधा, नूर खान (चकलाला), भोलारी, जेकबाबाद, सुक्कुर आणि रहीम यार खान या तळांवर मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचे दिसून आले आहे करण्याची ही पहिलीच वेळ नव्हती. १९७१ च्या युद्धादरम्यान, भारतीय हवाई दलाच्या २० व्या स्क्वॉड्रनने त्यांच्या हॉकर हंटर्सने नूर खान हवाई तळाला लक्ष्य केले होते.

### पाकिस्तानी हवाई तळांचे नुकसान

भारतीय सैन्याने 'ऑपरेशन सिंदूर' दरम्यान लष्कर-ए-तैयबा, जैश-ए-मोहम्मद आणि हिज्बुल मुजाहिदीन सारख्या दहशतवादी संघटनांचे ९ तळ उद्ध्वस्त केले होते. याचबरोबर १०० हून अधिक दहशतवाद्यांना ठारही केले होते. भारताच्या या कारवाईनंतर, पाकिस्तानी सैन्याने भारताच्या पश्चिम भागात ड्रोन आणि क्षेपणास्त्रे डागली होती, जी भारतीय लष्कराने यशस्वीरित्या रोखली होती. त्यानंतर भारताने पाकिस्तानी हद्दीत खोलवर निवडक लष्करी लक्ष्यांवर हल्ले केले होते."जेव्हा भारताने नूर खान एअरबेसवर ब्रह्मोस डागले, तेव्हा येणाऱ्या क्षेपणास्त्रात अण्वस्त्रे असू शकतात का, याचे विश्लेषण करण्यासाठी पाकिस्तानी लष्कराकडे फक्त ३०-४५ सेकंद होते. फक्त ३० सेकंदात यावर काहीही निर्णय घेणे ही एक धोकादायक परिस्थिती होती," असे सनाउल्लाह यांनी एका पाकिस्तानी वृत्तवाहिनीला सांगितले.

# सैफ अलीच्या मुलासाठी करणने केली चित्रपटाची घोषणा

करण जोहरने २८ जानेवारीला दुपारी त्याच्या सोशल मीडियावर एक पोस्ट केली. त्यावर कमेंट सेक्शनमध्ये लोकांनी उत्तर देत त्याला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला आहे. करणने बहुतेक प्रथमच अशा रीतीने एखाद्या चित्रपटाची घोषणा केली असल्याचं दिसत आहे. करणच्या या पोस्टची सध्या प्रचंड चर्चा होत आहे. या पोस्टमध्ये करणने चित्रपटासंबंधी तीन प्रश्न विचारले आहेत. या तीन प्रश्नांमधून करणने चांगलाच सस्पेन्स निर्माण केला आहे. नेमकं करण पोस्टमध्ये लिहितो, “ही कोणत्याही चित्रपटाची घोषणा नाही, किंवा असूही शकते जर तुम्ही मदत केलीत तर. गेल्यावर्षापासून आम्ही एका चित्रपटावर काम करत आहोत आणि याबद्दल चांगलीच गुप्तता पाळण्यात आली होती. चित्रपटाच्या दिग्दर्शकाचीच तशी मागणी होती. तर या काही हिंट आहेत ज्यावरून आम्ही नेमक्या कोणत्या चित्रपटाबद्दल बोलत आहोत ते तुम्हाला ओळखायचं आहे. पहिली हिंट म्हणजे यात एक अत्यंत लोकप्रिय अशी अभिनेत्री आहे, दुसरी हिंट म्हणजे यात दक्षिणेतील एक मोठा सुपरस्टार आहे ज्याने नुकताच एक जबरदस्त पॅन-इंडिया सुपरहीट चित्रपट दिला आहे. तिसरी हिंट अशी की यात एक लेगसी डेब्यू अभिनेता आहे जो या इंडस्ट्रीमध्ये स्वतःचं स्थान निर्माण करण्यासाठी फार उत्सुक आहे व प्रचंड मेहनत घेत आहे.”पुढे करण लिहितो, “हा चित्रपट जवळपास तयारच आहे लवकरच आम्ही तो प्रदर्शित करणार आहोत? तुमच्या मते हा

# ऐश्वर्याच्या समर्थनार्थ काय म्हणाले रजनीकांत?

माझे वडिल संघी असते तर, त्यांनी लाल सलाम सारखा सिनेमा केला नसता, असे वक्तव्य सुपरस्टार रजीनीकांत यांची मुलगी ऐश्वर्या हिने काही दिवसांपूर्वी केले होते. दरम्यान, आता रजनीकांत यांनी मुलीच्या वक्तव्यावर प्रतिक्रिया दिली आहे. रजनीकांत मुलीच्या समर्थनार्थ मैदानात उतरले आहेत. माझ्या मुलीने 'संघी' हा शब्द वाईट अर्थाने वापरला नाही, असे स्पष्टीकरण रजनीकांत यांनी दिले आहे. दाक्षिणात्य अभिनेता आणि सुपरस्टार रजनीकांत सध्या लाल सलाम या सिनेमामुळे चर्चेत आहेत. नुकताच लाल सलाम या सिनेमाचा ऑडिओ लाँच इव्हेंट पार पडला. यावेळी रजनीकांतची मुलगी आणि सिनेमाची दिग्दर्शक ऐश्वर्या देखील उपस्थित होती. यावेळी ऐश्वर्याने मनोगत व्यक्त केले होते. "माझे वडिल संघी नाहीत", असे ऐश्वर्या म्हणाली होती. दरम्यान, यानंतर ऐश्वर्या आणि रजनीकांत यांना सोशल मीडियावर ट्रोलिंगचा सामना करावा लागला. त्यानंतर रजनीकांत यांनी संघी या शब्दाबाबत मौन सोडले आहे. ऐश्वर्याला संघी हा शब्द वाईट अर्थाने वापरायचा नव्हता, असे रजनीकांत म्हणाले आहेत. लाल सलाम या सिनेमाचा ऑडिओ लाँच इव्हेंट काही दिवसांपूर्वी पार पडला. यावेळी ऐश्वर्याने वडील रजनीकांत यांच्यावर होणाऱ्या व्यक्तीगत टीकेला प्रत्युत्तर दिले होते. ऐश्वर्या म्हणाली होती की, सोशल मीडियावर माझ्या वडिलांना संघी म्हटले जात आहे. माझे वडिल संघी नाहीत, ते संघी असते तर त्यांनी लाल सलाम सारखा सिनेमा केला नसता. नेटकऱ्यांच्या ट्रोलिंगबाबत ऐश्वर्याने नाराजी व्यक्त केली.

# प्राजक्ता माळीचं सेलिब्रेशन

अभिनेत्री प्राजक्ता माळी (PRAJAKTTA MALI) ही सोशल मीडियावर ॲक्टिव असते. प्राजक्ताच्या सोशल मीडियावरील पोस्ट नेटकऱ्यांचे लक्ष वेधतात. नुकताच प्राजक्तानं एक खास व्हिडीओ सोशल मीडियावर शेअर केला आहे. या व्हिडीओमध्ये प्राजक्ता ही तिच्या कुटुंबासोबत 31 डिसेंबरचं सेलिब्रेशन करताना दिसत आहे. प्राजक्तानं शेअर केलेल्या व्हिडीओमध्ये ती कुटुंबासोबत ॲनिमल या चित्रपटामधील 'जमाल कुडू' या गाण्यावर डान्स करताना दिसत आहे. प्राजक्तानं डोक्यावर एक ग्लास ठेवलेला दिसत आहे. तसेच प्राजक्तानं तिच्या कुटुंबासोबत 'मै हूं डॉन' या गाण्यावर देखील डान्स केला. व्हिडीओमध्ये प्राजक्ता ही चुलीजवळ बसून भाकऱ्या थापताना देखील दिसत आहे. या व्हिडीओला प्रजक्तानं कॅप्शन दिलं, "ABOUT 31ST DECEMBER, आमचे बॉबी देओलS आणि डॉनS... यात माझा 2023 चा शेवटचा सेल्फी आणि 2024 चा पहिला सेल्फी देखील आहे." प्राजक्तानं शेअर केलेल्या व्हिडीओवर नेटकऱ्यांनी लाइक्स आणि कमेंट्सचा वर्षाव देखील केला आहे. एका नेटकऱ्यानं प्राजक्ताच्या व्हिडीओला कमेंट केली, "प्राजक्ता..खूपच भारी आहेस तू.कुटुंबाबरोबर जे तुझे क्षण असतात त्यांत तू खूप खुश, सुंदर दिसतेस. प्राजक्ता सर्व गुण संपन्न मुलगी." तर दुसऱ्या युझरनं कमेंट केली, "असेच क्षण जपायचे असतात प्राजक्ता आणि तू ते खुप भारी जपतेस THAT'S WE LOVE YOU . तू भाकरी करतानाचा पूर्ण व्हिडीओ टाक ना . मी मागे म्हटले होते ना की तु All ROUNDER आहेस तला भाकरी करतांना पाहून ते सिद्ध झाले.



# मी तुला पुढच्या लग्नाला बोलावेन

बॉलीवूड अभिनेता व सलमान खानचा भाऊ अरबाज खानने २४ डिसेंबर २०२३ रोजी दुसरं लग्न केलं. त्याने मेकअप आर्टिस्ट शुरा खानशी बहीण अर्पिता खानच्या घरी निकाह केला. त्याच्या लग्नाला सलमान खान, सोहेल खान, वडील सलीम खान, आई सलमा व हेलन यांच्यासह त्याचा मुलगा अरहानदेखील उपस्थित होता. अरबाजच्या दुसऱ्या लग्नाबद्दल सलमान खानने पहिल्यांदाच प्रतिक्रिया दिली आहे. बिग बॉस १७ च्या ग्रँड फिनालेमध्ये भारती सिंगने सलमान खानला अरबाज खानच्या लग्नाबाबत काही प्रश्न विचारले. बिग बॉस १७ च्या फिनालेमध्ये अरबाज खान व सोहेल खानही आले होते. यावेळी या तिघा भावांची चेष्टा-मस्करी पाहायला मिळाली. भारती सिंगने स्टेजवर उपस्थित अरबाजला गंमतीत विचारलं की, “तुम्ही आम्हाला तुमच्या लग्नाला बोलावलं नाही.” अरबाज म्हणाला, “त्यात काय, मी तुला पुढच्या लग्नाला बोलावेन. पण दुसऱ्याच्या लग्नात.”अरबाज असं म्हटल्यावर भारती सिंगने सलमान खानला प्रश्न विचारला. “मोठा भाऊ म्हणून तुम्ही अरबाजला लग्नाबाबत कोणताही सल्ला दिला नाही का?” यावर सलमान खान हसतो आणि म्हणतो “अरबाज कोणाचंही ऐकत नाही, जर तो ऐकता असता तर…”. यानंतर तो बोलणं थांबवतो. मग भारती स्टेजवर उपस्थित असलेल्या सोहेलच्या स्टाइलची खिल्ली उडवते. चप्पल आणि शॉर्ट्स घालण्याच्या त्याच्या कॅज्युअल फॅशन सेन्सची ती चेष्टा करते, ते ऐकून सलमान खानही हसतो. दरम्यान, अरबाज खानने त्याच्यापेक्षा २५ वर्षांनी लहान शुरा खानची दुसरं लग्न केलं. अरबाजचं पहिलं लग्न मलायका अरोराशी झालं होतं. १९ वर्षांच्या संसारानंतर त्यांनी सहा वर्षांपूर्वी घटस्फोट घेतला आणि त्यांना अरहान नावाचा मुलगा आहे. घटस्फोटानंतर मलायका अरोरा अर्जुन कपूरबरोबर रिलेशनशिपमध्ये आहे. तर अरबाजने शुराशी लग्न केलंय.बॉलीवूड अभिनेता व सलमान खानचा भाऊ अरबाज खानने २४ डिसेंबर २०२३ रोजी दुसरं लग्न केलं. त्याने मेकअप आर्टिस्ट शुरा खानशी बहीण अर्पिता खानच्या घरी निकाह केला. त्याच्या लग्नाला सलमान खान, सोहेल खान, वडील सलीम खान, आई सलमा व हेलन यांच्यासह त्याचा मुलगा अरहानदेखील उपस्थित होता. अरबाजच्या दुसऱ्या लग्नाबद्दल सलमान खानने पहिल्यांदाच प्रतिक्रिया दिली आहे.

# मयुरी देशमुखचा 'लग्नकल्लोळ'

मयुरी देशमुख, सिद्धार्थ जाधव आणि भूषण प्रधानयांची प्रमुख भूमिका असलेल्या ‘लग्नकल्लोळ’ या चित्रपटाचा जबरदस्त टिझर नुकताच प्रदर्शित झाला आहे. टिझर पाहून प्रेक्षक या धमाकेदार चित्रपटाची आतुरतेने वाट पाहाणार, हे नक्की! या चित्रपटाच्या टिझरला प्रेक्षकांनी चांगलीच पसंती दिलीय. त्यामुळे लग्नकल्लोळ सुपरहिट होणार यात शंका नाही.टिझरमध्ये सिद्धार्थ सोबत मयुरी लग्नमंडपात दिसत आहे तर दुसऱ्या क्षणी भूषण मयुरीला लग्नाची मागणी घालताना दिसत आहे. यावरून मयुरी नक्की कोणासोबत लग्न करणार आणि हा काय ‘लग्नकल्लोळ’ सुरू आहे, याचे उत्तर प्रेक्षकांना चित्रपट पाहिल्यावरच मिळणार आहे. चित्रपटात या प्रमुख कलाकारांसोबत अनेक दमदार कलाकार आहेत. हा लग्नाचा धमाका १ मार्चला उडणार आहे.मयुर तिरमखे फिल्म्स निर्मित या चित्रपटाचे, आण्णासाहेब रामचंद्र तिरमखे, मंगल आण्णासाहेब तिरमखे, डॉ. मयुर आण्णासाहेब तिरमखे निर्माते आहेत. तर मोहम्मद एस. बर्मावाला आणि डॉ. मयुर आण्णासाहेब तिरमखे दिग्दर्शित 'लग्न कल्लोळ' या चित्रपटाचे लेखन जितेंद्रकुमार परमार यांनी केले आहे.चित्रपटाबद्दल दिग्दर्शक, मोहम्मद बर्मावाला म्हणतात, " चित्रपटाची पहिली झलक प्रेक्षकांच्या भेटीला आली आहे. लग्न म्हटले की घरात कल्लोळ हा आलाच. परंतु हा कल्लोळ जरा वेगळा आहे. यात ट्विस्ट आहे. हा कौटुंबिक चित्रपट असून प्रेक्षकांसाठी निखळ मनोरंजनाचा खजिना आहे."मयुरी देशमुख, सिद्धार्थ जाधव आणि भूषण प्रधानयांची प्रमुख भूमिका असलेल्या ‘लग्नकल्लोळ’ या चित्रपटाचा जबरदस्त टिझर नुकताच प्रदर्शित झाला आहे. टिझर पाहून प्रेक्षक या धमाकेदार चित्रपटाची आतुरतेने वाट पाहाणार, हे नक्की! या चित्रपटाच्या टिझरला प्रेक्षकांनी चांगलीच पसंती दिलीय. त्यामुळे लग्नकल्लोळ सुपरहिट होणार यात शंका नाही.टिझरमध्ये सिद्धार्थ सोबत मयुरी लग्नमंडपात दिसत आहे तर दुसऱ्या क्षणी भूषण मयुरीला लग्नाची मागणी घालताना दिसत आहे. यावरून मयुरी नक्की कोणासोबत लग्न करणार आणि हा काय ‘लग्नकल्लोळ’ सुरू आहे, याचे उत्तर प्रेक्षकांना चित्रपट पाहिल्यावरच मिळणार आहे. चित्रपटात या प्रमुख कलाकारांसोबत अनेक दमदार कलाकार आहेत. हा लग्नाचा धमाका १ मार्चला उडणार आहे.मयुर तिरमखे फिल्म्स निर्मित या चित्रपटाचे, आण्णासाहेब रामचंद्र तिरमखे, मंगल आण्णासाहेब तिरमखे, डॉ. मयुर आण्णासाहेब तिरमखे निर्माते आहेत. चित्रपटाबद्दल दिग्दर्शक, मोहम्मद बर्मावाला म्हणतात, " चित्रपटाची पहिली झलक प्रेक्षकांच्या भेटीला आली आहे. लग्न म्हटले की घरात कल्लोळ हा आलाच. परंतु हा कल्लोळ जरा वेगळा आहे. यात ट्विस्ट आहे.



# मी असंही तिथे बॉलिंग करणार नाही!

## जडेजाचं इंग्लंडच्या माईंडगेम्सला चोख प्रत्युत्तर

। मुंबई । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**बर्मिंगहम कसोटीच्या दुसऱ्या दिवशी रवींद्र जडेजा आणि शुबमन गिल यांनी द्विशतकी भागीदारी करत इंग्लंडच्या गोलंदाजांच्या नाकीनऊ आणले होते. जडेजा आणि गिल दोघेही चांगला डिफेंन्स करत प्रसंगी मोठे फटके खेळत होते. इंग्लंडच्या गोलंदाजांकडून ही जोडी फोडणं कठिण झालं होतं. यादरम्यान इंग्लंडचे खेळाडू माईंडगेम्स खेळताना दिसले आणि सातत्याने जडेजाबरोबर पिचबाबत चर्चा करत होते. ज्याचा व्हीडिओ व्हायरल होत आहे.**




रवींद्र जडेजा ८९ धावांवर झेलबाद झाला आणि त्याचं शतक हुकलं. शुभमन गिल मात्र मैदानावर कायम राहत त्याने द्विशतक झळकावलं. गिल आणि जडेजा यांच्यात २०३ धावांची भागीदारी झाली होती जी शेवटी जोश टंगने तोडली. पण यापूर्वी मैदानावर नेमकी काय चर्चा सुरू होती, जाणून घेऊया.रवींद्र जडेजा आणि इंग्लंडचा वेगवान गोलंदाज ख्रिस वोक्स यांच्यातील संभाषणाचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. दोन्ही खेळाडू खेळपट्टीबद्दल बोलताना दिसले. खरंतर, रवींद्र जडेजाच्या शूजमुळे खेळपट्टी खराब होत होती. तेव्हा वोक्स त्याला खेळपट्टीकडे बोट दाखवत त्याने पिच खराब केल्याचं दाखवत होता. यादरम्यान इंग्लंडच्या गोलंदाजांना पिचकडून काहीच मदत मिळत नव्हती. जडेजाने खेळपट्टीकडे बोट दाखवत म्हटलं, "मी इथून आलो." यावर वोक्स म्हणाला, खेळपट्टीची काय अवस्था केलीये बघ तू. यानंतर जडेजा म्हणाला, मी तिथे बॉलिंग करणार नाहीये, काळजी नको करू. यानंतर काही वेळाने परत स्टोक्स पंचांना सांगत पिचजवळ घेऊन आला. जडेजाशी परत चर्चा करताना दिसलाय स्टोक्स आणि इंग्लंडचे माईंडगेम्स सातत्याने सुरू होते. यावर जडेजाने पण जबरदस्त उत्तर दिलं.स्टोक्स आणि पंच बोलत असताना जडेजा म्हणाला, "मी असं का करेन, माझं पूर्ण लक्ष फलंदाजीवर आहे." वरूण एरोन या संपूर्ण प्रकरणावर कॉमेंट्री करताना म्हणाला, "इंग्लंड विनाकारण माईंडगेम्स खेळतंय. जडेजाने असे अनेक माईंडगेम्स खेळले आहेत." इंग्लंडला दुसऱ्या दिवशी खेळपट्टीकडून बिलकुल मदत मिळत नव्हती. ज्यामुळे इंग्लंडचे गोलंदाज बरेच शॉर्ट बॉल टाकण्याचं प्लॅनिंग करत होते. पण त्याचा काही उपयोग झाला नाही. रवींद्र जडेजा ८९ धावांवर झेलबाद झाला आणि त्याचं शतक हुकलं. शुभमन गिल मात्र मैदानावर कायम राहत त्याने द्विशतक झळकावलं. गिल आणि जडेजा यांच्यात २०३ धावांची भागीदारी झाली होती जी शेवटी जोश टंगने तोडली. पण यापूर्वी मैदानावर नेमकी काय चर्चा सुरू होती, जाणून घेऊया. रवींद्र जडेजा आणि इंग्लंडचा वेगवान गोलंदाज ख्रिस वोक्स यांच्यातील संभाषणाचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. दोन्ही खेळाडू खेळपट्टीबद्दल बोलताना दिसले. खरंतर, रवींद्र जडेजाच्या शूजमुळे खेळपट्टी खराब होत होती. तेव्हा वोक्स त्याला खेळपट्टीकडे बोट दाखवत त्याने पिच खराब केल्याचं दाखवत होता. यादरम्यान इंग्लंडच्या गोलंदाजांना पिचकडून काहीच मदत मिळत नव्हती.जडेजाने खेळपट्टीकडे बोट दाखवत म्हटलं, "मी इथून आलो." यावर वोक्स म्हणाला, खेळपट्टीची काय अवस्था केलीये बघ तू. यानंतर जडेजा म्हणाला, मी तिथे बॉलिंग करणार नाहीये, काळजी नको करू. यानंतर काही वेळाने परत स्टोक्स पंचांना सांगत पिचजवळ घेऊन आला. जडेजाशी परत चर्चा करताना दिसलाय स्टोक्स आणि इंग्लंडचे माईंडगेम्स सातत्याने सुरू होते.

### खेळपट्टीची काय अवस्था केली

यावर जडेजाने पण जबरदस्त उत्तर दिलं.स्टोक्स आणि पंच बोलत असताना जडेजा म्हणाला, "मी असं का करेन, माझं पूर्ण लक्ष फलंदाजीवर आहे." वरूण एरोन या संपूर्ण प्रकरणावर कॉमेंट्री करताना म्हणाला, "इंग्लंड विनाकारण माईंडगेम्स खेळतंय. जडेजाने असे अनेक माईंडगेम्स खेळले आहेत." इंग्लंडला दुसऱ्या दिवशी खेळपट्टीकडून बिलकुल मदत मिळत नव्हती. ज्यामुळे इंग्लंडचे गोलंदाज बरेच शॉर्ट बॉल टाकण्याचं प्लॅनिंग करत होते. पण त्याचा काही उपयोग झाला नाही.खेळपट्टीची काय अवस्था केलीये बघ तू. यानंतर जडेजा म्हणाला, मी तिथे बॉलिंगच करणार नाहीये, काळजी नको करू. यानंतर काही वेळाने परत स्टोक्स पंचांना सांगत पिचजवळ घेऊन आला. जडेजाशी परत चर्चा करताना दिसलाय स्टोक्स आणि इंग्लंडचे माईंडगेम्स सातत्याने सुरू होते.

# आकाशदीपचे २ चेंडूत २ मोठे विकेट

## इंग्लंडच्या मालिकेतील शतकवीरांना गिल-राहुलने असं केलं झेलबाद

। नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**भारत वि. इंग्लंड दुसऱ्या कसोटीत भारताने धावांचा डोंगर उभारला आहे. भारतीय संघ पहिल्या डावात ५८७ धावा करत सर्वबाद झाला. यामध्ये शुबमन गिलने द्विशतक करत २६९ धावांची विक्रमी खेळी केली. तर जैस्वाल, जडेजा, वॉशिंग्टन सुंदर यांनी चांगली साथ देत संघाच्या धावांमध्ये मोठी भर घातली.**



यासह इंग्लंडच्या डावाला सुरुवात होताच भारताने सुरुवातीला दोन विकेट घेतले आहेत.कर्णधार शुबमन गिलने पहिल्या डावात द्विशतक झळकावत भारताला मोठ्या धावसंख्येच्या दिशेने नेलं. दुसऱ्या कसोटी सामन्यात शुबमन गिलने ३८७ चेंडूत २६९ धावा केल्या. यासह तो कसोटी क्रिकेटच्या इतिहासातील सर्वात मोठी खेळी खेळणारा भारतीय कर्णधार बनला. त्याने विराट कोहलीला मागे टाकलंय. २०१९ मध्ये भारतीय कर्णधार म्हणून कोहलीने दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या कसोटी सामन्यात २५४ धावांची खेळी केली. आता गिलने कसोटी क्रिकेटमध्ये सर्व भारतीय खेळाडूंना मागे टाकत पहिल्या स्थानावर पोहोचला आहे. गिलने फक्त फलंदाजीत नाही तर विकेटमध्येही मोठं योगदान केलं. गिलने कमालीची डाईव्ह करत चेंडू टिपला आणि भारताला पहिली विकेट मिळाली. दुसऱ्या कसोटीत जसप्रीत बुमराहच्या अनुपस्थितीत आकाशदीपला गोलंदाज म्हणून संधी मिळाली आहे. त्याने पहिल्याच डावात आपली निवड योग्य असल्याचं सिद्ध केलं.आकाशदीपला पहिल्या डावात गोलंदाजी आक्रमणाला सुरूवात करण्याची संधी दिली. आकाशदीपच्या पहिल्या षटकात जॅक क्रॉलीने दोन चौकार लगावत सुरुवात केली. त्यामुळे बुमराहची उणीव भासणार का अशी चर्चा सुरू होती. पण आकाशदीपने त्याच्या स्पेलमधील पुढच्या म्हणजेच तिसऱ्या षटकात दोन विकेट घेतल्या. आकाशदीपने बेन डकेटला पहिल्या ३ चेंडूवर एकही धाव दिली नाही.आकाशदीपच्या चौथ्या चेंडूबाजूच्या दिशेने फटका खेळला. तिथे स्लिपमध्ये गिल तैनात होता आणि त्याने बाजूला डाईव्ह मारत कमालीचा झेल टिपला आणि पहिली विकेट मिळवून दिली.

### 2 चेंडूत भारताला 2 मोठे विकेट

पोप पहिलाच बॉल खेळायला गेला आणि कट लागून मागच्या दिशेने उडाला. तिथे उभ्या असलेल्या राहुलने स्लिपमध्ये झेल टिपला. आधी राहुलच्या हातून चेंडू सुटला पण त्याने दुसऱ्या प्रयत्ना मात्र हा झेल टिपला आणि २ चेंडूत भारताला २ मोठे विकेट मिळाले. ऑली पोप आणि बेन डकेट यांनी पहिल्या कसोटीत शतकं झळकावली होती.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज™

ePaper

। शुक्रवार ।

। दि.4 जुलै 2025।

epaper.mahaenews.com

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

DYP DR. D. Y. PATIL EDUCATIONAL COMPLEX, AKURDI, PUNE

# Dr D Y Patil Educational Complex, Akurdi, Pune

*Approved by AICTE, DTE, MSBTE & Govt. of Maharashtra,*
*Accredited by NBA & Grade Status by NAAC, Affiliated to Savitribai Phule Pune University*

41 YEARS Academic Excellence

**ADMISSIONS OPEN 2025-26**

## Experience D Y Patil Educational Complex



| | | |
|---|---|---|
| **15k+** Students Placed | **52 LPA** Highest Package | **50,000+** Alumni |
| **1000+** Empanelled Recruiters | | **150+** University Toppers |

## Our Institutes

### D Y Patil College of Engineering (Autonomous)
***NRI Quota Open: AY 2025 – 26***
Accredited by NAAC with 'A' Grade & NBA
*UG – Comp / Mech / IT / E&TC / AIDS / Civil / Instrumentation & Control / R&A*
*PG – Comp / E&TC (VLSI/ES) / Civil (C&M/Env) / Mech (Design) / R&A*
*PhD – Mech / E&TC / Civil*

### D Y Patil Institute of MCA & Management
Accredited by NAAC with 'A' Grade & Affiliated to SPPU
*MCA / MBA / PhD (Management)*

### Dr D Y Patil College of Architecture
Accredited by NAAC with 'A' Grade & Approved by COA
*B Arch / M Arch (Construction Management) / D Arch*

### D Y Patil PGDM Institute, Akurdi, Pune
***NRI Quota Open: AY 2025 – 26***
Approved by A.I.C.T.E., New Delhi & Recognized by Govt. of Maharashtra
*Specializations: Marketing / Human Resource / Finance / Logistics & Supply Chain / Business Analytics / Innovation & Entrepreneurship / Agri Business / Pharma & Healthcare Management*

### Dr D Y Patil College of Agriculture Business Management
Affiliated to Krishi Vidyapeeth, Rahuri & Recognized by MCAER, Pune
*BSc (Hons) Agri Business Management*

### Dr D Y Patil College of Pharmacy
Affiliated to SPPU & Approved by PCI New Delhi
Accredited by NBA & NAAC with 'A+' GRADE
*D Pharm / B Pharm / Pharm D / M Pharm (Phcol) / M Pharm (Pharmaceutics) / M Pharm (DRA) / M Pharm (PQA) / M Pharm (Pchem) / M Pharm (PP) / PhD*

### Dr D Y Patil Institute of Pharmacy
Affiliated to MSBTE, Mumbai & Approved by PCI New Delhi
*D Pharm*

### Y B Patil Polytechnic
Approved by AICTE, Affiliated to MSBTE & Recognized by D.T.E. Maharashtra
*Diploma in Civil / Mech / Comp / E&C (Accredited by NBA)*

## Campus at a Glance

- Beautifully landscaped lush green campus
- Virtual Lab Nodal Centre of IIT Bombay
- Digital Classrooms & Libraries
- Online Teaching Learning Platforms
- Highly Qualified & Experienced Faculty
- Outstanding academic results
- Collaboration with International Universities
- Wi-Fi enabled campus / ERP Enabled Administration
- Extravagant Cafeterias & Sports Complex
- Ultra-modern Auditoriums, Seminar Halls
- Conducive & disciplined environment
- Incubation & Startup ecosystem
- State-of-the-Art Hostel for Girls & Boys

## Corporate Relations & Placement Cell

- Strong Alumni engagement
- Internship Opportunities in Industry
- Industry-Centric Training Programs
- International Placement Opportunities
- Notable Placement Record
- Employability Assessment Test conducted by SHL for students (First year to Final Year)
- Corporate Tie-ups & Partnerships with industry for student enrichment activities
- Participation of students in Hackathons & competitions organized by Industries
- Thrust on Personality Development, Soft Skills & Communication Skills in English in Language Laboratories

## Collaborations with Industry (MOU's & COE's)

JENDAMARK · wipro · NTT DATA · virtusa · B&R · Emcure · KNORR-BREMSE · NuLife · CitiusTech · SHL · McKinley Rice · bvg · Technouniq · RPG · CONSTROLOGIX · NASSCOM FOUNDATION · INDOVANCE · Tech Mahindra · DataTech Labs · EMERSON · newgen

SECTOR NO. 29, NIGDI PRADHIKARAN, AKURDI, PUNE 411044, MAHARASHTRA, INDIA
www.dypakurdipune.edu.in  admission@dypakurdipune.edu.in  @dypakurdipune
9373775038 / 9607957618 / 9075345011 / 9158195999

REGISTER HERE

**"Discover, Learn, Lead—The D Y Patil Way."**


Late Babanrao Gabaji Gawali Charitable Trust's
SPG INTERNATIONAL PUBLIC SCHOOL & JUNIOR COLLEGE
CBSE Affiliation No. : 1130741 • UDISE Code - 27252001012
BHOSARI CAMPUS : Sr. No. 203, Nr. Durwankur Lawns, Alandi Road, Bhosari, Pune-411039 (Maharashtra)
Powered by
JAI HIND EDUTECH
SPG INTERNATIONAL PUBLIC SCHOOL
Pre Primary to Class XII
LIMITED SEATS
Hurry up!!!
ADMISSION
OPEN
2025-2026
Bi-focal / Technical / Vocational Subject are available
For Science Stream
Computer Science
Crop Science
Electronics
Mechanical / Technical Automobile
Information Technology (IT)
For Commerce Stream
Banking
Marketing & Sales
Office Management
Small Industries & Self employment
Information Technology (IT)
CALL NOW : 9763441639 / 8657473241

## काळेवाडी येथील 1000 हजार घरांवर

# टांगती तलवार? खरं की काय?

### लोकप्रतिनिधीसुद्धा 'फेक नॅरेटिव्ह'चे बळी? : प्रारूप विकास आराखड्यात नागरिकांची दिशाभूल

। पिंपरी- चिंचवड । महाईन्यूज । अविनाश आदक

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिका प्रशासनाच्या प्रारुप विकास आराखड्यावरुन “फेक नॅरेटिव्ह” ची अक्षरश: 'फॅक्टरी' चालवण्यात येत आहे. या अपूर्ण माहितीच्या जाळ्यात राज्यातील सत्ताधारी भाजपाचे आमदारसुद्धा अडकले, ही शहराची मोठी शोकांतिका आहे. 'महाईन्यूज' याबाबत वस्तुस्थिती जाणून घेण्याचा प्रयत्न केला.**




रहाटणी (काळेवाडी-पवनानगर परिसर) ऑटो क्लस्टरकडून येणारा पवना नदीवरील पुलापासून (सर्व्हे नं. ९६, ९७ रहाटणी) ते दक्षिणेकडील चिंचवड गावाकडे जाणारा बीआरटी रस्त्यापर्यंत (सर्व्हे नं. ८० रहाटणी) च्या पश्चिमेकडील २००८ मध्ये मंजूर विकास योजनेनुसार सदरचा भाग शेतीक्षेत्र तसेच आरक्षण क्रमांक ६३९ बगीचा अन्वये प्रस्तावित होता. तथापि प्रारुप विकास योजनेमध्ये सर्व्हे. ८९, ९०, ९१, ९५, ९७, ९९/ पैकी या भागामध्ये रहिवास विभाग प्रस्तावित केला आहे.

तसेच, मंजूर विकास योजनेनुसार आरक्षण क्रमांक ६३९ बगीचा जागेवर ३ हेक्टर १६ आर. क्षेत्र विकसित झाले असून, (त्याचे नाव ज्योतिबा गार्डन आहे.) सदरचे आरक्षण खुल्या वापराचे असल्यामुळे उर्वरित ते कायम ठेवले आहे. खुल्या जागेत आरक्षणाच्या प्रस्तावानुसार, बांधकाम न करता फक्त जागा ताब्यात घेणे हिच बाब विचाराधीन असल्यामुळे उर्वरित १ हेक्टर ८८ आर आरक्षणाचे क्षेत्र विस्तारीत बगीचासाठी कायम ठेवले आहे. त्यामध्ये कोणताही फेरबदल केलेला नाही, ही वस्तुस्थिती आहे. मात्र, काही कथित नगररचनाकार प्रारुप विकास आराखड्यामध्ये १००० हजार घरे बाधित होणार, असा जावईशोध लावत आहेत. “आधळं दळतंय आणि कुत्र पिठ खातंय” अशी स्थिती आहे.

डीपीबाबत लोकांच्या मनांत भिती निर्माण करुन आंदोलने आणि निदर्शने करण्यासाठी प्रवृत्त केले जात आहे. मात्र, प्रारुप डीपीचा कोणीही वस्तुनिष्ठ अभ्यास करताना दिसत नाही. ही बाब शहराच्या विकासाच्या दृष्टीने अत्यंत घातक आहे.

### 'कनेक्टिव्हीटी' वाढणार...

जन आंदोलन करुन किंवा निवेदने, तकारी करुन हा प्रश्न सुटणार नाही. किंबहुना, शासन स्तरावर विकास योजना मंजूर करताना सदरचे विस्तारीत बगीच्याचे आरक्षण रद्द करता येवू शकेल. ज्यामुळे नागरिकांना कायमस्वरुपी दिलासा मिळेल. ज्योतिबा बगीच्या उत्तर-पूर्व चौकातील म्हणजे पवनानगरमधील गणेश मंदिरापासून ते पश्चिमेकडे बगीच्या लगत आणि उत्तरेकडे यु-टर्न स्वरुपात प्रस्तावित केलेला रस्त्यामुळे नागरिकांना काळेवाडीकडे जाण्यासाठी विरुद्ध जाण्याची आवश्यकता नाही. हा काही दिवसांपूर्वी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उद्घाटन केलेल्या काळेवाडी येथील मदर तेरेसा फ्लायओव्हरजवळील चिंचवड गावाकडील ये-जा करण्यासाठी तयार केलेल्या लूप रोडला जोडला जाणार आहे.

### एफएसआयमध्ये फायदा होणार

सर्व्हे नं. ९५ व ९६ च्या बांधालगत अस्तित्वातील उत्तर-दक्षिण १२ मीटर रस्त्याला व बीआरटी रस्त्याला १२ मीटर रस्ता नव्याने प्रस्तावित केला आहे. म्हणजे, पवनानगर भागातील नागरिकांना बीआरटी रस्त्याला पूर्वेकडे जाण्या-येण्यासाठी कायमस्वरुपी सुविधा मिळणार आहे. १५ मीटर रस्त्यालगतच्या नागरिकांना भविष्यात वाणिज्य वापर देखील अनुज्ञेय राहणार आहे. त्यामुळे उत्पन्नात आणि राहणीमानाचा दर्जा उंचावणार आहे. तसेच, सदरचा भाग हा बीआरटीच्या बफरमध्ये येतो आहे. त्यामुळेयदा एफएसआयमध्ये फायदा होणार आहे, ही बाब स्वागतार्ह आहे.


### तात्पर्य....


गेल्या महिनाभरापासून पिंपरी-चिंचवडमध्ये प्रारुप विकास आराखड्याबाबत राजकीय सोयीची मांडणी करण्यात आली. त्याद्वारे “पराचा कावळा” करण्याची भूमिका काही मंडळींनी घेतली. एक वातावरण निर्मिती झाली. नागरिकांची दिशाभूल केली आणि आंदोलने उभा करण्यास प्रोत्साहन दिले. याचा राजकीय फटका बसणार अशी धास्ती विद्यमान आमदार शंकर जगताप यांच्या मनात निर्माण झाली.

### आरक्षण रद्द करणे तांत्रिकदृष्ट्या शक्य...

तसेच, सदर आरक्षणालगत उत्तर बाजुस बीआरटी रस्त्यापासून १५ मीटरचा रस्ता नव्याने प्रस्तावित करण्यात आल्यामुळे सर्व्हे नं. ८९, ९०, ९१ आणि ९५ ते ९७ मधील नागरिकांसाठी रहिवास विभाग प्रस्तावित केला असून, जाणे-येणेसाठीसुद्धा रस्ता प्रस्तावित केला आहे. त्यामुळे बहुतांशी घरांना शेती विभागातून वगळून रहिवास विभागात समाविष्ट करण्यात आले आहे. परंतु, मंजूर विकास योजनेनुसारच्या आरक्षणामधील जागेतच निवासी अतिक्रमण विनापरवानगी अनधिकृतपणे विकसित झाल्यामुळे सदर नागरिकांच्या घरावर टांगती तलवार आहे. मात्र, याला पर्याय आहे. जे गार्डन विकसित झाले आहे. ते कायम ठेवावे आणि उर्वरित ब्ल्यू लाईन आणि रेड लाईनमधील विस्तारित बगीच्याचे आरक्षण रद्द करण्यात यावे. जे तांत्रिकदृष्या शासनस्तरावर शक्य आहे. मात्र, काही राजकीय हेतुने प्रेरीत मंडळी जुना डीपी आणि नवा डीपी अशी मांडणी करीत नाहीत.

विधान परिषद आमदार अमित गोरखे, उमा खापरे यांनीही ऐकीव माहितीच्या आधारे सभागृहामध्ये स्वत: सत्ताधारी पक्षाचे सदस्य असतानाही प्रशासकीय राजवट अर्थात राज्य सरकारच्या संपूर्ण नियंत्रणात कारभार असलेल्या महानगरपालिका प्रशासनावर टीका-टीपण्णी केली आणि “सेल्फ गोल” केला. राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी सदर प्रारुप डीपी अद्याप प्राथमिक स्टेजला आहे. त्यावर हरकती आणि सूचना घेण्यात येत आहेत. लोकप्रतिनिधींची बैठक घेण्यात येईल. त्यानंतर डीपी अंतिम होईल, असा दुजोदा दिला. काँग्रेसचे आमदार बंटी पाटील यांनी अभ्यासपूर्ण विश्लेषण केले. पण, शहरातील आमदार मात्र 'फेक नॅरेटिव्ह'ला बळी पडले.



## दहावी, बारावीत उल्लेखनिय कामगिरी

# गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव सोहळा मोठ्या उत्साहात !

## मोरया शिक्षण संस्थेचा वर्धापन दिन उत्साहात साजरा

। पिंपरी- चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**मोरया शिक्षण संस्था, चिंचवड यांच्या वतीने संस्थेचा वर्धापन दिन आणि इयत्ता दहावी व बारावीच्या शैक्षणिक वर्ष 2024-25 मधील गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव समारंभ ग.दि. माडगूळकर सभागृह, आकुर्डी येथे मोठ्या उत्साहात आणि दिमाखात पार पडला. या सोहळ्याचे प्रमुख पाहुणे म्हणून आबासाहेब गरवारे आर्ट्स ॲण्ड सायन्स कॉलेजचे प्राचार्य डॉ. मा. श्री. विलास उगले सर उपस्थित होते, तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मोरया शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. स्वप्निलजी शेडगे होते.**



या सोहळ्यात दहावी आणि बारावीच्या परीक्षांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना सन्मानित करण्यात आले. विद्यार्थ्यांना मेडल, रोख रक्कम व प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले. यावेळी मोरया शिक्षण संस्थेचे कार्यवाह आणि प्राचार्या सौ. इंद्रायणी माटे-पिसोळकर, संस्थेचे खजिनदार श्री. रणजीत सावंत, तहहयात विश्वस्त श्री. ऋत्विक पिसोळकर, श्री. अमित फडके, कार्यकारी सदस्य श्री. अभिषेक देव, डॉ. मनोजकुमार दवणे, कार्यकारी सदस्या सौ. प्रतिभाताई कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या प्रारंभी प्रास्ताविक करताना प्राचार्या सौ. इंद्रायणी माटे-पिसोळकर यांनी संस्थेच्या विविध शाळांमधील नाविन्यपूर्ण उपक्रमांची माहिती दिली. तसेच विविध शालेय व शालाबाह्य स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या यशाचा आढावा घेत संस्थेच्या यशस्वी वाटचालीबद्दल समाधान व्यक्त केले. यावर्षी दहावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांचा १००% निकाल लागल्याबद्दल त्यांनी शिक्षक, पालक आणि विद्यार्थ्यांचे विशेष कौतुक केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. सोनाली कोल्हे यांनी तर पाहुण्यांचे स्वागत आणि परिचय श्री. हनुमंत हुचगोळ यांनी केले. आभार प्रदर्शन कार्यकारी सदस्या सौ. प्रतिभाताई कुलकर्णी यांनी केले. मोरया शिक्षण संस्थेच्या या उपक्रमातून गुणवंत विद्यार्थ्यांना योग्य ते प्रोत्साहन मिळाले असून, भविष्यातही असे उपक्रम संस्थेच्या माध्यमातून राबविले जातील, असा विश्वास संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

### विद्यार्थी-पालकांची उपस्थिती लक्षणीय...

प्रमुख पाहुणे डॉ. विलास उगले सर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना मोबाईलच्या अति वापरामुळे होणारे आठ मोठे तोटे समजावून सांगितले व विद्यार्थ्यांना डिजिटल माध्यमांपासून योग्य अंतर राखण्याचा सल्ला दिला. तसेच शिक्षक, पालक आणि शाळेच्या सहकार्यामुळेच विद्यार्थ्यांना घडवणे शक्य होते, हे अधोरेखित केले. कार्यक्रमाला पालक-शिक्षक संघाचे उपाध्यक्ष मा. श्री. विशाल कांबळे, माता पालक संघाच्या उपसचिव मा. सौ. अर्चना क्षिरसागर, उपमुख्याध्यापक श्री. दिलीप कुमावत, पर्यवेक्षिका सौ. मैत्रेयी राजे, शिक्षक समन्वयक श्री. संजय खेडकर यांच्यासह मोठ्या संख्येने विद्यार्थी व पालक उपस्थित होते.

